# भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह... आघाड्यांचे राजकारण

**डॉ. अरविंद सोमनाथे**
(सहाय्यक प्राध्यापक)
रा. सू. बिडकर कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
हिंगणघाट जि. वर्धा

सारांश ( **Abstract** ) :

आघाडी शासनाच्या राजकारणामुळे राजकीय तडजोडी महत्त्वाच्या बनल्या आणि पक्षांची ध्येयधोरणे, भूमिका आणि विचारप्रणाली यांना दुय्मम स्थान प्राप्त झाले. दुसरे म्हणजे राजकारणात सामाजिक पाठिंब्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना आघाड्या कराव्या लागत असल्याने, विविध जातिसमूहांमध्ये राजकीय फूट पडलेली दिसून येते. याशिवाय धोरणांबाबतची अनिश्चितता, राजकीय स्थैर्याचा, सामूहिक उत्तरदायित्वाचा प्रश्न निर्माण झाला. पक्षांतरे, बंडखोरीचे प्रमाण वाढले. पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांचे स्थान बदलले, इत्यादी प्रतिकूल परिणाम दिसून येतात. संयुक्त किंवा आघाडी सरकार ही युरोपियन राजकीय व्यवस्थेत रूढ झालेली संकल्पना 1990 नंतरच्या भारतीय राजकीय प्रक्रियेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणून पुढे आली आहे. 1989 पासून ते 2004 पर्यंत झालेल्या सहा लोकसभा निवडणुकांत (1989, 91, 96, 98, 99, 2004) कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे या कालखंडात अल्पमतातील किंवा आघाडी सरकारे सत्तेवर आली. 2009 सालच्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे अवघड दिसत असल्याने आघाडीची प्रक्रिया सुरू असलेली पुर्ण देशाने पाहिली. आज घडीला आघाड्यांचे राजकारण केंद्रात आणि अनेक घटक राज्यांत अस्तित्वात असलेले आणि स्थिरावताना दिसून येते. सध्या भारतीय राजकारणाचे आघाडी शासन हे वास्तव आहे आणि त्याचा सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकार केलेला दिसतो.

भारतीय राजकीय प्रक्रियेचा एक भाग बनलेल्या आघाडी किंवा संयुक्त सरकारचा थोडक्यात अर्थ असा सांगता येईल: संसदीय शासन पद्धतीमध्ये असे गृहीत धरले आहे की, सार्वत्रिक निवडणुकीनंतर स्पष्ट बहुमत प्राप्त असणारा राजकीय पक्ष सरकार स्थापन करेल आणि अल्पमतातील पक्ष विरोधी पक्षाचे कार्य करतील. पण जेव्हा कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होत नाही, त्रिशंकू लोकसभा (किंवा त्रिशंकू राज्य विधानसभा) अस्तित्वात येते तेव्हा समस्या निर्माण होते. अशा परिस्थितीत आघाडी शासनाचा पर्याय पुढे येतो. अशा वेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात.अशा सरकारला आघाडी सरकार म्हणता येईल.

**बीज संज्ञा (key - words)**

आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रवाह, आघाड्यांचे राजकारण, केंद्र - राज्य संघर्ष.

**शोधनिंबधाची उद्दिष्टे (objectives of Research paper)**

1) आघाड्यांच्या राजकारणाची अपरिहार्यता तपासणे.

2) राजकीय पक्षांच्या बदलत्या प्रवाहाचे विश्लेषण करणे.

3) भारतीय संघराज्य पद्धतीत केंद्र-राज्य संघर्षाचे विवेचन करणे.

**प्रस्तावना (Introduction) :**

आघाड्यांचे राजकारण : युरोपियन (European) अनुभव

प्रातिनिधिक शासनपद्धती असलेल्या पश्चिम युरोपातील (western Europe) बहुतेक देशांमध्ये आघाड्यांचे राजकारण केंद्रस्थानी आढळते. येथील आघाड्यांच्या राजकारणाचे (Collations Politics) ठळक वैशिष्ट्य म्हणजे विशिष्ट स्वरूपाची सौदेबाजी आणि वाटाघाटीची चर्चा, या गोष्टी प्रत्येक निवडणुकीनंतर तेथे होताना दिसून येतात. 1983 च्या मध्यापर्यंत युरोपातील केवळ तीन लोकशाही देशांमध्ये ब्रिटन, (England) स्पेन (Spain) आणि ग्रीसमध्ये (Grik) एकपक्षीय बहुमत असलेले शासन होते. तर उर्वरित देशांमध्ये अल्पमतातील किंवा आघाड्यांचे शासन होते. 1990 ते 1995 च्या दरम्यान जवळजवळ 91 अशी मंत्रिमंडळे होती ज्यामध्ये 19 एक पक्षीय शासन, 68 बहुपक्षीय आघाड्यांचे शासन आणि 4 काळजीवाहू सरकारे होती. असे असले तरी संसदीय व्यवस्थेप्रमाणे आघाड्यांच्या शासनाचे संस्थीकरण झालेले नाही.

आघाड्यांच्या राजकारणाची प्रक्रिया व्यवस्थितपणे समजावून घेण्यासाठी या घटनेच्या मुळाशी असलेल्या आकृतिबंधाचा शोध घ्यावा लागेल. आघाडीचा सिद्धांत (Theory) दोन व्यापक परंपरामध्ये विकसित झाला आहे. आघाडीचे राजकारण (Collations Politics) एकाच वेळी दोन परस्परविरोधी दिशांशी जवळीक साधते. एका बाजूला युरोपियन राजकारणाची परपंरा आहे तर दुसऱ्या बाजूला खेळी सिद्धांताची परंपरा आहे.

1. युरोपियन (European) राजकीय परंपरा ‘अनुभवावर' व संशोधनाच्या (of Research) परंपरेवर आधारित आहे. या परंपरेअंतर्गत युरोपमधील आघाडीच्या राजकारणातील अनुभवाशी विगमनात्मक

सिद्धांताद्वारे सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला जातो. यात विशिष्टलक्षी अभ्यास पद्धत (specific target study method) वापरली जाते. युरोपातील आघाडी शासनाचा अभ्यास करण्यासाठी जी माहिती उपलब्ध होते ती म्हणजे प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या आघाडी शासनाविषयीची माहिती होय. प्रारंभीच्या आघाडी सिद्धांताच्या कसोटीवरून आघाडीच्या शासनाची मूलभूत माहिती घेऊन त्या कसोट्यांचा उपयोग नवीन सिद्धांताच्या विकासाकरिता करण्यात येऊ लागला. सिद्धांताची गुणवत्ता तपासण्यासाठी जुनीच माहिती उपयोगात आणली जायची, पण यात अभ्यासकांची चूक नव्हती. कारण त्यांच्यासमोर युद्धेतर काळात स्थापन झालेल्या विशिष्ट प्रकारच्या मर्यादांनी युक्त युरोपीय शासनपद्धतीचे जग होते. या जगामध्ये नवीन माहितीची भर टाकणे काळाच्या ओघात शक्य होते.

2. खेळी सिद्धांताचे समर्थन करणारे अभ्यासक, आघाडी ही खेळी सिद्धांतातील मूलभूत संकल्पना (Basic Concept) मानतात. यात आघाडीच्या निर्मितीच्या प्रक्रियेस खेळाची उपमा दिली जाते. विलियम रिकरच्या (William ricker) मते, खेळ जिंकल्यामुळे होणारे फायदे हे मर्यादित असतात. फायदा एकाला तर त्याचा अर्थ दुसऱ्याला तोटा होणार, पण झालेले फायदे हे झालेल्या तोट्याएवढेच असतात. यात प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याऐवजी सत्ता टिकविण्यावर अधिक भर असतो. खेळी सिद्धांताच्या मुळाशी Rational choice Theory ची परंपरा आहे. आघाडीचे राजकारण हे सामाजिक देवाणघेवाणीच्या विशिष्ट तर्कसंगत पद्धतीप्रमाणे होते. सत्ताप्राप्तीच्या खेळीमध्ये विजयासाठी राजकीय पक्ष तर्कसंगत वर्तन करण्याची शक्यता असते. तर्कसंगत वर्तन (Rational behavior) म्हणजे असे वर्तन की,त्यात उपलब्ध पर्यायामधून अशी रणनीती किंवा पर्याय निवडणे की जो त्या पक्षाला फायदा मिळवून देईल. 1989 नंतर भाजपाने राज्याराज्यांतील प्रादेशिक पक्षांशी आघाड्या करून पक्षविस्ताराची जी व्यूहरचना आखली त्याच्या पाठीमागे खेळी सिद्धांतातील (Rational choice Tradition) असल्याचे ई.श्रीधरन यांचे मत आहे.

परंतु दोन्ही परंपरा ह्याविरुद्ध चालताना दिसतात. दोन्ही सैद्धांतिक परंपरा आघाडीच्या प्रक्रियेच्या वेगवेगळ्या पैलूंवर अभ्यास करण्यात मग्न आहेत. कारण युरोपियन राजकारण व खेळी सिद्धांताचे दृष्टिकोन (Rational choice Tradition) विश्लेषणाच्या दृष्टीने भिन्न असून ते एकमेकांना सहाय्यक ठरू शकत नाहीत. खेळी सिद्धांताचे संशोधन अमेरिकेत काम करणाऱ्या लोकांनी केले. ते स्वत:ला अचूकतेचे परिमाण समजू लागले होते. युरोपियन राजकारणातील अभ्यासकांना हे सर्व अनाकलनीय होते. याचा परिणाम असा झाला की, युरोपियन

राजकारणातील अभ्यासकांनी व्यापक दृष्टिकोनातून निर्णय घेत स्वत:ला खेळी सिद्धांतातील दृष्टिकोनापासून वेगळे केले. कारण खेळी सिद्धांतातील दृष्टिकोन समजण्यास ते असमर्थ ठरत होते व त्यांच्या दृष्टीने खेळी सिद्धांताचे दृष्टिकोन अप्रासंगिक होते. युरोपियन (European) राजकारणातील लोकांशीसंबंधित सर्व बाबी यात समाविष्ट होत्या. दोन्ही गटातील विद्वानाजवळ समान गोष्टीबद्दल बोलत आहेत, पण त्यांची भाषा मात्र वेगळी असल्याचे जाणवते.

युरोपातील अनेक देशांनी आज आघाड्यांच्या राजकारणाचा स्वीकार केला असला तरी त्या देशातील राज्यघटनांमध्ये (In the Constitution ) मात्र यासंदर्भात कोणत्याही तरतुदी नाहीत. बहुपक्षीय (Multilateral) राजकारणातून उद्भवलेल्या परिस्थितीला हाताळण्यासाठी आघाडी सरकारे (collation Government ) उदयास आली. काही राज्यघटनांमध्ये अशा सरकार निर्मितीसाठी अनुकूल तरतुदी आहेत. याबाबत जर्मनीचे उदाहरण सांगता येईल. जर्मनीतील आघाडीनिर्मितीच्या प्रक्रियेवर तेथील राजकीय संस्कृती, भू-राजकीय परिस्थिती, संघराज्याची कार्यपद्धती आणि मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांचा झालेला सर्वलक्षी विकास इत्यादी घटकांचा मोठा प्रभाव पडतो.

**युरोपियन व भारतीय आघाड्यांची तुलना :**

युरोपप्रमाणेच भारतातदेखील आघाड्यांचे राजकारण स्थिरावताना दिसून येते. पण युरोपियन देशातील आघाडी शासन आणि भारतातील आघाड्यांची सरकारे यांच्यात मूलभूत फरक आढळतो. भारतीय राजकीय व्यवस्था आणि युरोपियन राजकीय व्यवस्थांमध्ये काही साम्य आणि भेद स्थळे आहेत. परंतु राजकीय संस्कृती आणि लोक भिन्न असल्यामुळे राजकीय प्रदाने देखील भिन्न आहेत. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही (parliamentary Democracy) असल्याने भारतातील आघाड्यांचा प्रयोग हा महत्त्वपूर्ण ठरतो. भारताच्या तुलनेत युरोपियन देशांत आघाडी शासनाचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. परंतु त्या देशांचे प्रश्न, त्यांचे स्वरूप भारतापेक्षा वेगळ्या प्रकारचे आहेत. विकासाची एक विशिष्ट पातळी त्यांनी गाठली आहे. भारताचे तसे नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की, तिकडे आघाडीची सर्वच सरकारे स्थिर असतात. युरोपियन देशातही एकपक्षीय बहुमत प्राप्त शासनाच्या तुलनेत आघाडीचे शासन अस्थिर व कमी कालावधीकरिता सत्तेवर येतात. परंतु त्यांचे स्वरूप हे सहमतीवर व तडजोडीवर अवलंबून असते. जितकी वैचारिक विविधता (Ideological Diversity) असेल तेवढी आघाडी अस्थिर असते. एका स्पष्ट धोरणात्मक कार्यक्रमावर एकत्र झालेली आघाडी सत्ताप्राप्तीच्या हेतूने एकत्र आलेल्या आघाडीपेक्षा सापेक्षत: स्थिर

असते. जेव्हा केंद्रस्थानी एक प्रबळ पक्ष असतो तेव्हा ती आघाडी स्थिर असते. याउलट अनेक प्रभावी पक्ष असणारी आघाडी अस्थिर असते.

ई.श्रीधरन यांच्या मते, जेव्हा अर्थव्यवस्था मजबुतीकडे जात असते तेव्हा आघाडी स्थिर असते. युरोपातील देशात अशी परिस्थिती आहे. परंतु अर्थव्यवस्था अडचणीत असते तेव्हा आघाडी अस्थिर बनते. कारण त्यावेळी धोरणाबाबत त्यांच्यामध्ये सामंजस्य आढळत नाही. सामाजिक व आर्थिक समता हीदेखील आघाडीच्या घटकांवर अवलंबून असते. त्यांच्या मते सामाजिक,सांस्कृतिक आणि धार्मिक विषमतेने भरलेल्या भारतासंदर्भात आघाड्यांचा अभ्यास आवश्यक आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. कारण त्याचा प्रभाव सामाजिक, आर्थिक ध्येयधोरणावर पडत असतो. ई.श्रीधरन यांच्या मते...

1. पाश्चात्य लोकशाहीची तुलना करता भारतात कमालीची सामाजिक विविधता व आर्थिक विषमता आढळते.

2. केंद्रातील आघाडीत सहभागी असणाऱ्या राजकीय पक्षांची संख्याही पाश्चात्य देशातील आघाडीत सहभागी असणाऱ्या पक्षांच्या संख्येपेक्षा अधिक असते.

3. पाश्चात्य देशांच्या (Western Countres ) तुलनेत भारतीय संघराज्य पद्धतीमध्ये मोठी असणारी पक्षांची संख्या (अनेक प्रादेशिक पक्ष) की जे विविध राज्यात सत्तेवर असतात.

4. युरोपात फक्त पक्षीय स्पर्धा दिसून येते, तेथे भारताप्रमाणे जातींवर आधरित स्पर्धा नसते.

5. युरोपात पक्षांचे औपचारिक संघटन (Formal organization) दिसून येते तर भारतात अनौपचारिक संघटन असते. युरोपातील पक्षांचे संघटन मजबूत असते व पक्षशिस्त पाळली जाते. त्यामुळे पक्षफुटीचे प्रकार कमी असतात. याउलट भारतातील पक्षांचे संघटन विस्कळीत स्वरूपाचे असते, पक्षात शिस्त नसते, त्यामुळे पक्षांत वारंवार फूट पडतात. त्यामुळे आघाड्यांचे स्वरूप व वर्तन वेगवेगळे असते. म्हणूनच भारतातील आघाड्यांचा प्रयोग हा युरोपियन देशातील आघाड्यांच्या प्रयोगापेक्षा वेगळा ठरतो.

**आघाड्यांचे राजकारण : भारतीय संदर्भात**

नव्वदीच्या दशकात भारतीय राजकीय प्रक्रियेत बरेचसे बदल घडून आले. उदाहरणार्थ, काँग्रेस व्यवस्थेचा ऱ्हास, भाजपचा उदय, बसपाची वाटचाल इत्यादी. या बदलांच्या मुळाशी राजकीय स्पर्धेची बदललेली संरचना आहे. 1980 च्या दशकाच्या शेवटी भारतीय राजकारणात तीन मुद्दे महत्त्वपूर्ण ठरले, ज्यांचा पुढील राजकारणावर प्रभाव पडला. मंडल आयोगाचा(of the mandal commission) मुद्दा, नवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार आणि बाबरी मशिदीचा पाडाव हे तीन मुद्दे स्पर्धेची राजकीय चौकट ठरविण्यात महत्त्वपूर्ण बनले. त्यांच्यामागे विविध शक्ती उभ्या राहू लागल्या. शिवाय 1989 च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्याने काँग्रेस व्यवस्थेच्या ऱ्हासाची प्रक्रिया वेगाने घडून आली. काँग्रेसपासून दूर स्थित्यंतर होण्याचा नव्वदीतील हा काळ होता. 1990 च्या व त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये अनेक राज्यांनी, प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसपासून स्वत:ला अलग केले. हा प्रवास नव्वदच्या मध्यंतरात राष्ट्रीय राजकारणातील उदयास आलेला दिसतो. पक्षपद्धतीचे बदलते स्वरूप, कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमताचा अभाव, प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व व त्यातून आघाड्यांच्या राजकारणाचे प्रयोग झालेले दिसतात. भारतात अनेक पक्ष असले तरी स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात (1977 ते 1980 या जनता सरकारच्या कालखंडाचा अपवाद वगळता) 1989 पर्यंत केंद्रात काँग्रेस पक्षाचे एकपक्षीय वर्चस्व होते. स्वातंत्र्य लढ्यातील वारशाने काँग्रेसला एक अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले होते. खरे तर या कालखंडात काँग्रेस हीच एक आघाडी होती. भारतातील विविध जाती-वर्गांना सामावून घेणारी ती एक आघाडी होती. रजनी कोठारींनी भारतीय राजकीय व्यवस्थेचे 'काँग्रेस व्यवस्था' असे वर्णन केले. काँग्रेस एक मुख्य राजकीय प्रवाह होता आणि त्यात विविध विचारसरणीचे लोक होते. काँग्रेसला पर्याय उभा करण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट, समाजवादी, जनसंघ आदींनी केला, पण त्यांना यश आले नाही. 1962 नंतर राममनोहर लोहिया यांनी 'बिगर काँग्रेसवादा'चा सिद्धांत मांडून काँग्रेसला पर्याय देण्याची रणनीती आखली.काँग्रेसचे विरोधक एकत्र आले तर मतांची विभागणी न होता त्या पक्षाचा पराभव करता येणे शक्य आहे, असे पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकातील अनुभवावरून लोहियांचे मत बनले. 1967 च्या निवडणुकीत आठ राज्यांत काँग्रेस पराभूत होऊन सात राज्यांत संयुक्त सरकारे आली. विरोधी पक्ष एकत्र आले, तर काँग्रेसला निवडणुकीत हरवता येते हे त्यामुळे स्पष्ट झाले. त्यानंतर आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या 1977 च्या सार्वत्रिक निवडणुकी अगोदर त्यावेळची संघटना काँग्रेस, जनसंघ,चरणसिंगांचा भारतीय लोकदल आणि समाजवादी पक्ष यांनी मिळून जनता पक्षाची स्थापना केली. 1977 च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार सत्तेवर

आले. काँग्रेसला प्रथमच केंद्रातील सत्ता गमवावी लागली. परंतु जनता प्रयोग अल्पजीवी ठरला. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेमुळे जनता सरकार 1980 मध्ये कोसळले. केंद्रात पुन्हा काँग्रेसचे एकपक्षीय प्रभुत्व प्रस्थापित झाले. परंतु या दरम्यानच टप्याटप्प्याने काँग्रेसच्या ऱ्हासाची प्रक्रिया घडून आली.काँग्रेसचे अखिल भारतीय स्वरूप संपुष्टात आले.

**निष्कर्ष (conclusion) :**

नव्वदीच्या दशकात काँग्रेसचे एकपक्षीय वर्चस्व संपुष्टात येऊन भारतात खऱ्या अर्थाने बहुपक्षीय स्पर्धा आकारास आली. बहुपक्षीय स्पर्धेमुळे कोणत्याही एका राजकीय पक्षाला लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळेनासे झाले. अनेक पक्ष उदयास आले तरी कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रभाव देशव्यापी नाही. कोणत्याही एका पक्षाला सर्व समाजघटकांचा पाठिंबा नाही. शिवाय कोणत्याही पक्षाकडे सर्वमान्य देशव्यापी नेतृत्व नाही. काँग्रेसारखा राष्ट्रव्यापी पक्ष एकीकडे आपला व्यापक जनाधार गमावत असताना दुसरीकडे भाजप एका विशिष्ट संख्याबळाच्या पुढे जात नाही. कम्मुनिस्ट, जनता दल व राज्याराज्यांतील प्रादेशिक पक्षांची ताकद मर्यादित आहे. थोडक्यात, प्रबळ पक्षाच्या अभावामुळे एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे कठीण झाले. त्यातून विभाजित कौल मिळू लागल्याने लोकसभेची अवस्था त्रिशंकू बनली आणि त्यातून आघाड्यांची सरकारे सत्तेवर आलेली दिसून येतात. केंद्राप्रमाणेच आज अनेक घटक राज्यांत आघाडी सरकारे अस्तित्वात आहेत. त्याचे स्वरूप साधारणतः एक राष्ट्रीय पक्ष व राज्यातील प्रबळ प्रादेशिक पक्ष किंवा एक राष्ट्रीय पक्ष व एकापेक्षा अधिक प्रादेशिक पक्ष अशी संयुक्त सरकारे अस्तित्वात आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा, पंजाब, ओरिसा, केरळ,पश्चिम बंगाल, महाराष्ट्र इत्यादी राज्यांत आघाडी शासन असल्याचे दिसून येते. केंद्रात आणि राज्यांत आघाडी शासनाचे जे प्रयोग झाले त्याचे निवडणूकपूर्व, निवडणुकेतर, अल्पमतातील, बहुमतातील, विचारसरणीवर आधारित (डावी आघाडी, उजवीआघाडी, मध्यममार्गी आघाडी), गैरकाँग्रेस, गैरभाजप असे प्रकार पाडता येतील. आघाडी शासनाच्या राजकारणामुळे राजकीय तडजोडी महत्त्वाच्या बनल्या आणि पक्षांची ध्येयधोरणे, भूमिका आणि विचारप्रणाली यांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. दुसरे म्हणजे राजकारणात सामाजिक पाठिंब्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना आघाड्या कराव्या लागत असल्याने, विविध जातिसमूहांमध्ये राजकीय फूट पडलेली दिसून येते. याशिवाय धोरणांबाबतची अनिश्चितता, राजकीय स्थैर्याचा, सामूहिक उत्तरदायित्वाचा प्रश्न निर्माण झाला. पक्षांतरे, बंडखोरीचे प्रमाण वाढले. पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांचे स्थान बदलले. इत्यादी प्रतिकूल परिणाम दिसून येतात. यातून काही सकारात्मक बदलही घडून

आले. स्वत:च्या ताकदीवर कधीच सत्तेपर्यंत येऊ न शकणाऱ्या लहान पक्षांना, मागास समूहांना सत्तेत प्रतिनिधित्व मिळाले. महत्त्वाचे म्हणजे प्रादेशिक पक्षांना महत्त्व प्राप्त झाल्याने केंद्र-राज्य संबंधात बदल होऊन राज्यांचे महत्त्व वाढले.

थोडक्यात भारतात काँग्रेस, भाजप, बसपा, माकप आणि राज्याराज्यांतील प्रादेशिक पक्ष यांच्यामुळे बहुपक्षीय स्पर्धा दिसत असली तरी ही स्पर्धा काँग्रेस व मित्रपक्ष आणि भाजप व मित्रपक्ष अशा प्रमुख दोन आघाड्यांच्या चौकटीतच काही काळ चालण्याची शक्यता आहे. कारण भारतातील सध्याची पक्षपद्धती एकाच राजकीय पक्षांचे स्पष्ट बहुमत स्थापन होण्याच्या स्थितीत नाही. येथून पुढील काळात राजकीय पक्षांना संकुचित सामाजिक आधार, पक्षाच्या प्रादेशिक विस्ताराच्या मर्यादा आणि देशव्यापी नेतृत्वाचा अभाव इत्यादी घटक पाहता कोणताही एक पक्ष प्रबळ होईपर्यंत आघाड्यांचे प्रयोग होत राहणारच.

**संदर्भग्रंथ सूची (Bibliography) :**

भोळे,भा.ल. ( 2011) भारतीय राज्यव्यवस्था,नागपूर: पिंपळापुरे प्रकाशन.

पळशीकर, सुहास (2008) सत्तासंघर्ष,पुणे : समकालीन प्रकाशन..

फाडीया,बि..एल. (2017) आंतर्राष्ट्रीय राजनीती सिद्धांत एव समकालीन राजनीतिक मुद्दे. आगरा : साहित्य भवन पब्लिकेशन.